**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाइन, नागपूर ४४०००१**

---

**<u>ई-मेलव्दारे</u>**

क्रमांक : कक्ष-१०(२)/आस्था/एक/निवडणूक सेवा/प्र.क्रं.२४(१८-१९)/ २४६
नागपूर ४४०००१, दिनांक: ११/९/२०१९

प्रति,
प्रधान सचिव (वने),
महसूल व वनविभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय:- निवडणूक मध्ये क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची सेवा न घेणेबाबत.

संदर्भ:- १) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. ४६४/INST /२००८-ईपीएस, दिनांक २६/१२/२००८

२) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. ४६४/INST /२०१४-ईपीएस, दिनांक २८/२/२०१४

३) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१०६/१९८६/०८-०९, दिनांक २०/३/२००९

भारतीय निवडणूक आयोग यांचे कडील संदर्भिय पत्र क्र. १ दिनांक २६/१२/२००८ व दिनांक २८/२/२०१४ तसेच भारतीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे माहे फेब्रुवारी २०१९ मधील हॅंडबुक फॉर रिटर्निंग ऑफिसर मधील डॉक्युमेंट २३ एडिसन १ पुस्तकातील पान क्र. ५१ मधील मुद्दा क्र. ३.३.२ नुसार “Officers of the Indian Forest Service as notified by ECI and Territorial Staff of Forest Department” यांना निवडणूक आयोगाने निवडणुकीचे कामकाजातून वगळले आहे.

२. या संदर्भात या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ३ दिनांक २०/३/२००९ अन्वये वन विभागातील भारतीय वन सेवेतील वरिष्ठ तसेच क्षेत्रीय स्तरावरील वन विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांची सेवा निवडणुकीच्या कामाकरिता अधिग्रहीत करू नये असे विभागीय आयुक्त (सर्व) व जिल्हाधिकारी (सर्व) यांना विनंती करण्यात आलेली होती. बीट वनरक्षक, परीमंडळातील कार्यरत वनपाल व प्रादेशिक वनक्षेत्रपाल व वन्यजीव शाखेतील क्षेत्रीय कर्मचारी व अधिकारी हे कार्य आयोजनेनुसार कामे राबविणे, वनांचे आगीपासुन संरक्षण करणे, वन हद्दीवर बुरूजांचा तपासणी व दुरूस्ती, सर्वेक्षण व सिमांकन, अतिक्रमण हटविणे, अवैध वृक्षतोड व वन्यजीवांची शिकार प्रकरणी वनगुन्हा नोंदविणे, गुन्हेगारांना अटक करणे, वनक्षेत्रात वनेत्तर कामे होणार नाही याची दक्षता घेणे, वन्यप्राण्यामुळे पीक नुकसान, पशूधन हानी प्रकरणे इत्यादि कामांची जबाबदारी पार पडतात. त्यामुळे प्रादेशिक व वन्यजीव क्षेत्रातील वनरक्षक, वनपाल व वनक्षेत्रपाल यांच्या निवडणूक कामाकरिता नेमणुका न करण्याबाबत शासन स्तरावरून निवडणूक आयोगास कळविण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१६८(१८-१९)/४८१, दिनांक ३०/३/२०१९ अन्वये शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. २९३४/२०१९ मध्ये न्यायालयाने दिनांक ९/४/२०१९ रोजी खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहे.

*"Our attention is invited to the communication dated 20-12-2008 issued by the Election Commission of India regarding deployment of officers and other staff for election duty. Clause (a)(i) and (v) relate to senior officers of the Indian Forest Service and territorial staff of Forest Department. According to the pititioner-Union, they are the forest guards/foresters, who have to perform their duties to guard the forests and they are, therefore, exempted from election duty.*

*The respondents may consider and pass an appropriate order in terms of the decision of the Election Commission of India."*

४. निवडणूक आयोगाने नमूद केल्यानुसार तसेच उच्च न्यायालयाने दिनांक ९/४/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार प्रादेशिक वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक (सामाजिक वणीकरणातील कर्मचाऱ्यासह) व वन्यजीव संरक्षित क्षेत्रात कार्यरत वनरक्षक, वनपाल व वनक्षेत्रपाल आणि या व्यतिरिक्त विशेष सेवा अंतर्गत वन संरक्षणाकरिता सेवेत असलेले कर्मचारी, मानव वन्यजीव संघर्ष मधील जलद बचाव दलातील कर्मचारी व ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमा मध्ये गुंतलेले कर्मचारी यांना निवडणूक कामातून वगळणेबाबत शासन स्तरावरून योग्य आदेश निर्गमित होण्यास विनंती आहे.

सहपत्र:- न्यायालयीन आदेश प्रत

(यु.के.अग्रवाल)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वनबल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रतिलिपी:- (ई-मेलव्दारे) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व यांना माहितीस्तव अग्रेषीत.

49



IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH, NAGPUR

Writ Petition No.2934 of 2019
Maharashtra Forest Guards-Forester Union, Nagpur, through State General Secretary Shri Indrajit s/o Haribhau Baraskar
Versus
The State of Maharashtra, through its Principal Secretary (Forest), Department of Revenue & Forest, Mantralaya, Mumbai, and others.

| Office Notes, Memoranda of Coram, appearances, Court's orders or directions and Registrar's order | Court's or Judge's orders |
|---|---|

Shri G.G. Bade, Advocate for Petitioner.
Shri N.S. Rao, Assistant Government Pleader for Respondent Nos.1 to 5.

**Coram : R.K. Deshpande & S.M. Modak, JJ.**
**Dated : 9th April, 2019**

Issue notice for final disposal of the matter, to the respondents, returnable on 3-7-2019.

Shri N.S. Rao, the learrned Assistant Government Pleader, waives service of notice for the respondent Nos.1 to 5.

Our attention is invited to the communication dated 20-12-2008 issued by the Election Commission of India regarding deployment of officers and other staff for election duty. Clause (a)(i) and (v) relate to senior officers of the Indian Forest Service and territorial staff of Forest Department. According to the petitioner-Union, they are the forest guards/foresters, who have to perform their duties to guard the forests and they are, therefore, exempted from election duty.

The respondents may consider and pass an appropriate order in terms in terms of the decision of the Election Commission of India.

(S.M. Modak, J.) (R.K. Deshpande, J.)

Lanjewar

::: Uploaded on - 09/04/2019 ::: Downloaded on - 09/04/2019 18:13:21 :::